मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्लास्टिकमुक्त पिंपरी चिंचवडसाठी प्रशासन सक्त!

## प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्यांवर पाच ते पंचवीस हजारांची दंडात्मक कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने पिंपरी चिंचवड शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनजागृती सुरू केली आहे. प्लास्टिक पिशव्यांचा वापर न करण्याचे आवाहन महानगरपालिकेकडून सातत्याने करण्यात येत आहे. मात्र, त्यानंतरही प्लास्टिक पिशव्यांचा वापर केल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असेही महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



प्लास्टिकमुक्त पिंपरी चिंचवड मोहिमेचा भाग म्हणून आरोग्य विभाग "ह" क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्रमांक ३१ मधील नवी सांगवी येथील साई चौक भाजीमार्केट येथे प्लास्टिक बंदी जनजागृती उपक्रम घेण्यात आला. तसेच 'ड' क्षेत्रीय कार्यालय येथील प्रभाग क्रमांक २९ मधील लक्ष्मीनगर येथे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून उपस्थित नागरिकांना झिरो प्लास्टिक, प्लास्टिक फ्री झोन, सिंगल युज प्लास्टिक, प्लास्टिकचे पर्यावरण व मानवी जीवनावर होणारे विपरीत परिणाम, याबाबत माहिती देण्यात आली. त्याचबरोबर प्लास्टिक पिशवीचा वापर टाळून कापडी पिशवीचा वापर करावा, असे आवाहन देखील यावेळी करण्यात आले याशिवाय प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्यांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

**जनजागृतीसाठी पथनाट्य सादरीकरण**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून कचरामुक्त, प्लास्टिकमुक्त शहरासाठी विविध ठिकाणी पथनाट्यांचे सादरीकरण देखील करण्यात येत आहे. या पथनाट्याच्या माध्यमातून नागरिकांना स्वच्छतेबाबत तसेच कचऱ्याच्या वर्गीकरणाबाबत माहिती दिली जात आहे. तसेच बाजारपेठ तसेच व्यावसायिक ठिकाणी ओला व सुका कचरा विलगीकरण करून तो कचरा महापालिकेच्या घंटागाडीत देण्याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

**अशी आहे दंडाची तरतूद**

- » बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर पहिल्यांदा केल्यास - ५,००० रुपये
- » बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर दुसऱ्यावेळी केल्यास - १०,००० रुपये
- » बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर तिसऱ्या वेळी केल्यास - २५,००० रुपये व ३ महिने करावास.

"सरकारने प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी घातली आहे. प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणे, हा कायदेशीर गुन्हा आहे. त्यामुळे बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्या विक्रेत्याबरोबरच ग्राहकांवर दंडात्मक कारवाई बरोबरच कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद आहे. त्यामुळे नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर करू नये. आपले शहर प्लास्टिकमुक्त होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.

- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त.

---

# महावितरण समस्यांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांना "साकडे"

## 22 के.व्ही. रोहित्राचे 11 के.व्ही. रोहित्रांमध्ये रूपांतरण करा : आमदार महेश लांडगे यांचे निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील महावितरणच्या २२ के.व्ही. स्तराच्या रोहित्राचे ११ के.व्ही. रोहित्रांमध्ये रूपांतरण करावे आणि अखंडित वीज पुरवठा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवडमध्ये भोसरी गाव, तळवडे, चिखली, च-होली, दिघी, मोशी या भागात दाट लोकवस्ती आहे. तसेच, भोसरी एम.आय.डी.सी जे. एफ. एस व डी ब्लॉक, सेक्टर १० आणि १२ या ठिकाणी औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणारे बहुतांश कर्मचारी येथे राहतात. भोसरी मतदार संघामध्ये लघुदाब घरगुती ३ लाख ६२ हजार २१६, वाणिज्य ३७ हजार ४१५, औद्योगिक १७ हजार ७९२ इतर ४ हजार २४९ व उच्चदाब ५९३ ग्राहक आहेत. सदर ग्राहकांना प्राथमिक वितरण २२ के.व्ही. वीजस्तर विद्युत वाहिनीद्वारे वीजपुरवठा केला जातो.



शहरात इंद्रायणीनगर परिसरामध्ये दि.५ सप्टेंबर २०२० रोजी विद्युत प्राणांकित अपघात झाला होता. सदर अपघात २२/०.४३३ के.व्ही. विद्युत रोहित्र फुटून, रोहित्रातील तेल दूरवर फेकले गेले व हे गरम तेल तेथे जवळ राहत असलेल्या व्यक्तीवर पडून प्राणांकित अघपात घडला. तसेच २००९-१० मध्ये नेवाळे मळा २२/०.४३३ के. व्ही. विद्युत रोहित्र फुटून रोहित्रामधील तेल १००-१५० फुट दूर फेकले गेले व एक महिला सदर परिसरामध्ये भांडी धुत असताना महिलेच्या अंगावर तेल पडून सदर महिला ४५ टक्के भाजली. सदर घटना अतिशय दूर्देवी आहेत. २२ के.व्ही. वीज स्तर उच्च क्षमता असल्यामुळे रोहित्रामधील बिघाट झाल्यास रोहित्रामधील तेलाचे तापमान व दबावात वाढ होते. उच्च तापमानामुळे तेलामध्ये गॅस तयार होतो, जो दबाव निर्माण करतो. हा दबाव नियंत्रित न झाल्यास रोहित्राची बाहय संरचना फाटते व स्फोट होऊन तेल जास्त दबावाने बाहेर दूरवर फेकले जाते. सदर कारणामुळे अपघात होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे दाट लोकवस्तीमध्ये सदर प्रकारची अपघात होऊ नये यासाठी वीज वितरण प्रणालीमध्ये सुधारणांची आवश्यकता आहे. विशेषतः उच्च कार्यक्षमता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी २२ के. व्ही. व्होल्टेज क्षमता ११ के. व्ही. व्होल्टेजमध्ये रूपांतरण करणे गरजेचे आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

# सोसायट्यांच्या सांडपाणी प्रकल्पावर महापालिकेचा वॉच

## गृहप्रकल्पांत उभारण्यात आलेल्या सांडपाणी आणि मैलापाणी प्रक्रिया प्रकल्पांवर ठेवणार लक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेकडून मुळा आणि मुठा नदीतील पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे. शहरातील जायका प्रकल्प येत्या वर्षात पूर्ण करण्याचे काम केले जाणार आहे. दुसरीकडे नदीकाठ सुधार प्रकल्पाचे कामदेखील वेगाने सुरु आहे. त्यामुळे थेट नदीत सांडपाणी जाणार नाही, याची काळजी घेतली जाणार असून शहरातील तीनशेहून अधिक मोठ्या गृहप्रकल्पांत उभारण्यात आलेल्या सांडपाणी आणि मैलापाणी प्रक्रिया प्रकल्पांवर आता महापालिका लक्ष ठेवणार आहे.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी 'सीविक मिरर'ला याबाबत माहिती दिली. महापालिकेकडून शहरात सुरु असलेल्या प्रकल्पांचा आढावा घेतला जात आहे. नदीच्या पाण्याचे प्रदूषण वाढत असल्याने जलचरांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पर्यावरणप्रेमींकडून यामुळे संताप व्यक्त केला जाऊ लागला आहे. सांडपाणी थेट नदीपात्रात सोडले जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून महापालिकेला सातत्याने नोटीस दिली जात आहे. त्यामुळेच महापालिकेने गेल्या तीन वर्षात पूर्ण होऊ न शकलेले प्रकल्प वेगाने या वर्षाअखेर पूर्ण करण्याचे धोरण हाती घेतले आहे.

महापालिकने घालून दिलेल्या नियमानुसार, मोठ्या सोसायट्यांना सांडपाणी प्रकल्प उभारुन ते कार्यान्वित ठेवणे आवश्यक आहे. हे प्रकल्प खरंच सुरु आहेत का, याची तपासणी केली जाणार आहे. तसेच या प्रकल्पांवर ऑनलाईन पद्धतीने मध्यवर्ती केंद्राशी जोडण्याचा विचार प्रशासनाकडून सुरु आहे. तसेच सोसायट्यांकडून होणाऱ्या पाण्याच्या अतिरिक्त वापर कमी करण्याविषयी उपाययोजना केली जाणार आहे, असे पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.

जायका प्रकल्पातंर्गत ११ एसटीपी (मैलापाणी आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प) उभारले जात आहेत. यातील पाच प्रकल्प हे जुलै महिन्यात कार्यान्वित होत आहे. मुळा-मुठा नदीत सोडल्या जाणाऱ्या पाण्यातील दूषित घटकांचे प्रमाण कमी करण्यासाठी हे प्रकल्प महत्वाचे ठरणार आहेत. प्रकल्पात प्रक्रिया केलेले पाणी नदीत सोडले जाणार आहे. या पार्श्वभूमीवर विविध विभागांचा समन्वय असणे गरजेचे आहे, असे पृथ्वीराज बी. पी. यांनी नमूद केले. जुलै महिन्यात खराडी, वारजे, वडगाव, मुंढवा आणि मत्स्य बीज केंद्र (मांजरी) येथील एसटीपी प्रकल्प कार्यान्वित होत आहे. या प्रकल्पांत मैलापाणी आणि सांडपाणी हे वाहिन्यातून आणले जाणार आहे. या वाहिन्या जोडण्याच्या कामाचा आढावा सध्या घेतला जात आहे.

नदीकाठ सुधार प्रकल्प आदींच्या कामाचाही आढावा घेण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. नदीकाठ सुधार प्रकल्पातील बंडगार्डन येथील पहिला टप्पा लवकरच सुरु होणार आहे. या भागात नदीत थेट जाणारे सांडपाणी आणि मैलापाणी एसटीपी प्रकल्पांकडे वळविण्यासंदर्भात निर्णय घेतला जाणार आहे.

महापालिकेच्या हद्दीत सुमारे तीनशेहून अधिक मोठ्या गृहप्रकल्पांत मैलापाणी आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आहेत. या प्रकल्पांतून सुमारे ११० एमएलडी इतक्या पाण्यावर प्रक्रिया केली जाऊ शकते. सध्या महापालिकेच्या प्रकल्पांतून सुमारे ४५० एमएलडी इतक्या पाण्यावर प्रक्रिया केली जात आहे. जर हे गृहप्रकल्पातील प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालले तर ११० एमएलडी इतक्या पाण्यावर आणखी प्रक्रिया होऊ शकते. महापालिकेसमोर एक हजार एमएलडी इतक्या पाण्यावर प्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी १० टक्के वाटा हा गृहप्रकल्पांचा मिळू शकतो. जायका प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर आणखी ५०० एमएलडी इतक्या पाण्यावर प्रक्रिया केली जाऊ शकते. गृहप्रकल्पातील एसटीपी उभारणीच्या कामांचा दर्जा चांगला असावा, याकरिता निकष अधिक कडक केले जाणार आहेत.



"शंभराहून अधिक सदनिका असलेल्या मोठ्या गृहप्रकल्पांत सांडपाणी आणि मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे बंधनकारक आहे. यासाठी गृहप्रकल्पांना मिळकतकरात सवलतही दिली जाते. परंतु हे प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित नसल्याचे अनेकवेळा आढळून आले आहे. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने हे प्रकल्प मध्यवर्ती केंद्राशी जोडण्यात येणार आहे. त्यादृष्टीने विचार सुरू आहे. यामुळे कोणत्या गृहप्रकल्पातील एसटीपी बंद आहे, याची माहिती तत्काळ मिळण्यास मदत होणार आहे.

**- पृथ्वीराज बी. पी, अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.**

# पालिकेची नवीन प्रशासकीय इमारत 2028 पर्यंत पूर्ण होणार

## पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाचा दावा : इमारतीच्या बांधकामाला गती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाला गती मिळाली असून, प्रकल्पाचे महत्त्वाचे टप्पे पूर्ण झाले आहेत. जानेवारी २०२३ मध्ये सुरू झालेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा उद्देश महानगरपालिकेची सर्व कार्यालये एकाच ठिकाणी केंद्रीभूत करणे, नागरी सेवा अधिक सुलभ करणे आणि प्रशासनाची कार्यक्षमता वाढवणे हा आहे. हा प्रकल्प ३६ महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

महापालिकेच्या नवीन इमारतीचे तळघरातील तीन मजले आणि तिसऱ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम सध्या पूर्ण झाले आहे. पूर्णत्वास आल्यानंतर ही इमारत नागरी सेवा केंद्र, बहुउद्देशीय हॉल, संग्रहालय, प्रदर्शन हॉल आणि ई-गव्हर्नन्स सेंटरसारख्या अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असणार आहे.

नवीन प्रशासकीय इमारत ८.६५ एकरच्या विस्तृत भूखंडावर उभी राहणार असून, एकूण ९१ हजार ४५९ चौरस मीटर बांधकाम क्षेत्रामध्ये विकसित केली जाणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ३१२.२० कोटी खर्च अपेक्षित आहे. शाश्वत विकासाच्या दृष्टीने ही इमारत इंटिग्रेटेड हॅबिटॅट असेसमेंटसाठी ५ स्टार ग्रीन रेटिंग आणि आयजीबीसी प्लॅटिनम रेटिंग मिळवण्याच्या दृष्टीने विकसित करण्यात येणार आहे. सौरऊर्जा, पाणी पुनर्वापर प्रणाली आणि ग्रीन स्पेसेस यांसारख्या वैशिष्ट्यांमुळे पर्यावरणपूरक वातावरण टिकवून ठेवण्यास देखील मदत मिळणार आहे.

**प्रमुख वैशिष्ट्ये**

इमारतीची रचना: ६ ते १८ मजल्यांचे चार विंग, प्रत्येकी ३ तळघरे

नवीन सुविधा: नागरी सेवा केंद्र, बहुउद्देशीय हॉल, ई-गव्हर्नन्स सेंटर, ग्रंथालय, क्लिनिक इत्यादी

तळमजल्यावरील महत्त्वाच्या सुविधा:

वाचनालय : १२५ चौरस मीटर

प्रदर्शन हॉल/संग्रहालय: ३८० चौरस मीटर

बहुउद्देशीय हॉल: ५७० चौरस मीटर



"महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमुळे नागरिकांना अधिक सोयीस्कर सेवा मिळतील. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांच्या मदतीने ही इमारत केवळ प्रशासकीय केंद्रच नव्हे, तर शाश्वत विकासाचे प्रतीक ठरेल.

**- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# वाळू माफियांकडून राजरोसपणे मुळा नदीची लचकेतोड सुरू

## अवैध वाळू उपसा जोरात, लाखो ब्रास वाळूची चोरी -पिंपरी-चिंचवड अप्पर तहसीलदार यांचे होतेय दुर्लक्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातून वाहणाऱ्या मुळा नदी पात्रात राजरोसपणे वाळू उपसा सुरू असल्याचे समोर आले आहे. पिंपळे निलख परिसरातून दिवसा व रात्री जेसीबीच्या सहय्याने अवैध वाळू उपसा केला जातो. याकडे पिंपरी चिंचवड अप्पर तहसीलदारासह स्थानिक तलाठ्यांचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे वाळू माफियांकडून राजरोसपणे मुळा नदीची लचकेतोड सुरू आहे.

पिंपरी चिंचवड आणि पुणे शहराच्या हद्दीमधून वाहत असलेल्या मुळा नदीचे दोन्ही महापालिकेकडून नदी सुधार प्रकल्पाचे काम सुरू आहे. त्यापैकी पिंपरी-चिंचवड महापालिकेने पहिल्या टप्प्यात पिंपळे निलख येथे नदीकाठावर हे काम सुरु केले आहे. मात्र, एकीकडे नदी सुधार प्रकल्पाचे काम सुरु असताना त्याच कामाचा फायदा घेत वाळू माफियांनी मुळा नदीतून वाळू तस्करी करण्याची संधी साधली आहे.

पिंपळे निलख येथे मुळा नदी परिसरातून अवैधपणे वाळू उपसा करून रात्रीत ट्रॅकर, हायवाद्वारे त्याची वाहतूक केली जाते. महापालिकेने मुळा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम सुरु केले. मुळा नदीचे पात्र स्वच्छ व सुंदर व्हावे, त्यातून शहराची हवा स्वच्छ राहण्यास मदत होईल, शहर पर्यटनास चालना मिळण्यास मदत होईल, असा दावा प्रशासनाने केला आहे. परंतु, हे काम करताना होणारी वृक्षतोड आणि नदी पात्रात माती, मुरुम, दगड टाकण्यावरून नदी सुधार प्रकल्पावरून पर्यावरणप्रेमी संताप व्यक्त करीत आहे.

मुळा नदी सुधार प्रकल्पाचे काम सुरु असताना नदी पात्रातलगत या ठिकाणी टाकण्यात येत असलेल्या मुरूमाची वाहतूक करणाऱ्या वाहनांकडे गौण खनिज उत्खननाच्या परवानगीचे चलन नाहीत. त्यांच्याकडे उत्खननाचे कोणतेही आदेश अथवा चलनाच्या पावत्या नसल्याचे दिसून आलेले आहे. नदी पात्रातून वाळू माफिया मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा करत आहेत. नदीत ठिकठिकाणी वाळूचे ढिगारे दिसत आहेत. नदी सुधारच्या कामासाठी ठेकेदाराने नदीच्या किनारी मुरूम, माती, दगड टाकून रस्ते तयार केले आहेत. त्याचा फायदा काही वाळू तस्करी करणारे घेत आहेत. मुळा नदीतून रात्रीतून लाखो ब्रास वाळूची चोरी होवून अवैध वाहतूक सुरु आहे. याची पिंपरी-चिंचवड अप्पर तहसीलदारांकडे सामाजिक कार्यकर्त्यांनी तक्रार करुनही कोणतीही दखल घेतलेली नाही. त्यामुळे नदी पात्रातून गौण खनिजाचे बेकायदेशीर उत्खनन करुन शासनाच्या महसूलावर पाणी फिरत आहे.



### हजारो ब्रास मुरुमाचे चलन नसल्याचे उघड

» मुळा नदी सुधार प्रकल्पाचे काम सुरु असताना नदी पात्रातलगत या ठिकाणी टाकण्यात येत असलेल्या मुरूमाची वाहतूक करणाऱ्या वाहनांकडे गौण खनिज उत्खननाच्या परवानगीचे चलन नाहीत. त्यांच्याकडे उत्खननाचे कोणतेही आदेश अथवा चलनाच्या पावत्या नसल्याचे दिसून आलेले आहे. याबाबत केवळ संबंधितावर २० हजार रुपये दंडात्मक कारवाई केली आहे.

### ट्रक, हायवा नेमके कोणाचे?

» वाळूचे ढिगारे रात्रीच्या अंधारात ट्रक, हायवा, ट्रॅक्टर भरून इतर ठिकाणी नेले जात आहेत. नदीत वाळू उपसा किंवा वाहतूक करण्यासाठी कोणताही परवानगी महसूल विभागाकडून दिलेली नाही. तसे असताना हा प्रकार शहरात सुरू असल्याचे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. नदी पात्रातून चोरी होणाऱ्या वाळूची सुमारे पाच हजार रुपये ब्रास प्रमाणे विक्री केली जात आहे. स्थानिक आणि परिसरातील बांधकाम व्यावसायिकांना ही वाळू बांधकामासाठी पुरविली जात आहे. अशा पद्धतीने अवैध वाळू उपसा करणारे ट्रक, हायवा नेमके कोणाचे आहेत हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

> मुळा नदी पात्रातून वाळू चोरी होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार संबंधित स्थानिक महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना देवून अवैध वाळू उपसा करणाऱ्यावर कडक कारवाई करा, अशा सूचना दिल्या आहेत.
>
> - जयराज देशमुख, अप्पर तहसिलदार, पिंपरी-चिंचवड

# पवना धरणातील पाणीसाठा 49 टक्क्यांवर

## नागरिकांनी पाणी जपून वापरावे, पाटबंधारे विभागाचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील पवना धरणात आजमितीस (दि.२१ मार्च) ४९.३० टक्के इतका पाणीसाठा शिल्लक आहे. उन्हाची तीव्रता वाढल्याने धरणातील पाणीसाठ्याचे झपाट्याने बाष्पीभवन होत आहे. त्यामुळे धरणाची पाणीपातळी घटू लागली असून नागरिकांनी पाणी जपून वापरावे असे आवाहन पाटबंधारे विभागाने केले आहे.

पवन मावळ विभागात असणारे पवना धरण हे यंदा (गतवर्षी पावसाळ्यात) पूर्ण क्षमतेने भरून ओव्हरफ्लो झाले होते. पवना धरणावर पिंपरी-चिंचवड शहर, लहान मोठे उद्योग व्यवसाय, मावळ तालुक्यातील अनेक खेडी व तेथील शेती अवलंबून आहे.

मागच्या वर्षी याच तारखेला म्हणजे २१ मार्च २०२४ रोजी हा पाणीसाठा ४८.७५ टक्के इतका होता. याचा अर्थ यंदा धरणात गतवर्षीपेक्षा अधिक पाणीसाठा आहे. असे असले तरीही यंदाचा उन्हाळा अधिक तीव्र असून पाणी घटण्याचे प्रमाण जास्त असल्याने पाणी नियोजन व व्यवस्थापन गरजेचे आहे. धरण विभागाने पाणी जून अखेर पुरेल असे नियोजन केले असले तरीही नागरिकांनीही पाण्याचा अपव्यय टाळून गरजेनुसार पाणी वापरले पाहिजे. यामुळे धरण पूर्ण भरलेले असले तरीही पाण्याची मागणी व अन्य कारणाने होणारी घट यामुळे धरणातील जलसाठा झपाट्याने कमी होत आहे. सध्या पवना धरणात असलेला पाणीसाठा जून अखेर पर्यंत पुरेल, असे नियोजन केल्याचे पवना धरण उपविभागाचे अभियंता रजनीश बारिया यांनी सांगितले. तरीही नागरिकांनी पाणी जपून वापरावे असेही त्यांनी सांगितले आहे.



### गतवर्षीपेक्षा यंदा अधिक जलसाठा

» पवना धरणात शुक्रवारी (दि.२१) घेतलेल्या माहितीनुसार ४९.३० टक्के इतका पाणीसाठा होता. परंतु मागच्या वर्षी याच तारखेला म्हणजे २१ मार्च २०२४ रोजी हा पाणीसाठा ४८.७५ टक्के इतका होता. याचा अर्थ यंदा धरणात गतवर्षीपेक्षा अधिक पाणीसाठा आहे. असे असले तरीही यंदाचा उन्हाळा अधिक तीव्र असून पाणी घटण्याचे प्रमाण जास्त असल्याने पाणी नियोजन व व्यवस्थापन गरजेचे आहे. धरण विभागाने पाणी जून अखेर पुरेल असे नियोजन केले असले तरीही नागरिकांनीही पाण्याचा अपव्यय टाळून गरजेनुसार पाणी वापरले पाहिजे.

# राजगुरू यांच्या स्मारक उपेक्षितच!

## सरकारने 254 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला त्यापैकी 104 कोटी संबंधित विभागाकडे मागील अर्थसंकल्पात वर्ग करण्यात आला होता

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात बलिदान देणारे थोर क्रांतिकारक हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या जन्मस्थळ राष्ट्रीय स्मारकाचे काम आजही धीम्या गतीने सुरू आहे. सरकारने 254 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला त्यापैकी 104 कोटी संबंधित विभागाकडे मागील अर्थसंकल्पात वर्ग करण्यात आला होता. मात्र अजूनही स्मारकातील संपादनाचे काम झाले नाही. सरकार या थोर देशभक्ताच्या स्मारकारकडे अजूनही दुर्लक्ष करीत असल्याची राज्यभर चर्चा आहे.

राज्य सरकारने हुतात्मा शिवराम हरी राजगुरू राष्ट्रीय स्मारक, परिसर विकास आराखडा तीन वर्षांपूर्वी तयार केला होता. स्मारक विकास कामाकरिता 220.43 कोटी रुपये आणि भुसंपादनाकरिता 33.68 कोटी असा एकूण 254.11 कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला होता. पैकी मागील अर्थसंकल्पात 104 कोटी रुपये निधी उपलब्ध झाला मात्र प्रत्यक्षात काम मात्र सुरू झालेले काम धीम्या गतीने सुरू असून संपादनाबाबत अजूनही निर्णय झाला नाही. केवळ बैठकांचे सत्र सुरू आहे.

राजगुरूनगर शहरात होणाऱ्या हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांच्या जन्मस्थळ वाड्याच्या राष्ट्रीय स्मारकासाठी दोन वर्षांपूर्वी विकास आराखडा झाल्यानंतर परिसरातील 45 मालमत्ता धारकांचे पर्यायी पुर्नवसन प्रश्न प्रलंबित आहे. त्यासाठी केवळ तरतूद झाली आहे. प्रत्यक्षात संपादनासाठी काहीच हालचाली होत नाहीत. विकासकामाबाबत आवश्यक निधी उपलब्ध न झाल्यामुळे हुतात्मा राजगुरु यांच्या स्मारकाबाबत अजूनही हेळसांड होत आहे. अधिकारी राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे स्मारकाचे काम वर्षानुवर्षे रखडले आहे. हुतात्मा राजगुरू यांची जयंती-पुण्यतिथी आली की अधिकारी आणि राजकीय नेते जागे होतात. दरवर्षी नव्या घोषणा केल्या जातात, बैठक घेतल्या जातात पुढे मात्र येरे माझ्या मागल्या या म्हणीप्रमाणे कारभार चालत आहे.

यावेळीही हीच परिस्थिती आहे येत्या रविवारी (दि. 23) हुतात्मा राजगुरू यांची पुण्यतिथी आहे. शासन पातळीवर हालचाली सुरू झाल्या आहेत. तब्बल दोन वर्षे झाली आराखड्याला मंजुरी मिळून मात्र काही मोजकेच बांधकाम सुरू झाले आहे.



### अधिकारी, राजकीय नेत्यांची डोळेझाक

» राजगुरूनगर येथील थोर क्रांतिकारक हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या जन्मस्थळाचे राष्ट्रीय स्मारकात रुपांतर करण्याचे काम धीम्या गतीने सुरू आहे. यापूर्वी बांधण्यात आलेली जमस्थळ खोली चार महिन्यांपूर्वी पडण्यात आली. आतापर्यंत तिचा केवळ पाया बांधला आहे. भीमा नदी बाजूकडून असलेली संरक्षण भिंतीचे काम सुरू आहे. मागीलवर्षीच्या अर्थसंकल्पात 104कोटी रुपये निधी मंजूर होऊनही काम; मात्र झाले नाही परिसर संपादन प्रक्रिया लांबणीवर पडली आहे. एकूणच येथील स्मारकाच्या काम रेंगाळलेल्या अवस्थेत असून अधिकारी, राजकीय नेते याकडे डोळेझाक करीत असल्याची सर्वत्र चर्चा आहे.

### दोन वर्षांनंतर सकारात्मक बैठक

» तब्बल 2 वर्षे उलटल्यानंतर मालमत्ता धारकासोबत सकारात्मक बैठक झाली. मालमत्ताधारकांचे वारसदार नोंदणी प्रथम करावी लागणार आहे. या बैठकीत मालमत्ता धारकांनी यावेळी प्रकल्पग्रस्त म्हणून दाखला देऊन वारसांना शासकीय नोकरीत घ्यावे, स्मारक परिसरात व्यवसायिकतेसाठी प्राधान्य मिळावे आदी मागण्या करण्यात आल्या. या प्राथमिक बैठकीत करण्यात आलेल्या मागण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे सविस्तर अहवाल पाठवण्याचे प्रांत अनिल दौंडे यांनी सांगितले. यावेळी प्रभारी तहसीलदार राम बीजे, पुरातत्व विभागाच्या वास्तुविशारद अर्चना देशमुख, मुख्याधिकारी अंजिक्य रणदिवे, भुमिअभिलेख विभागाचे नितीन सूर्यवंशी, नायब तहसीलदार रविंद्र मोरे, आदिसह बांधकाम, कृषी विभागाचे अधिकारी वर्गासह मालमत्ता धारक उपस्थित होते.

### पुन्हा शासनामार्फत जुजबी हालचाल

» येत्या रविवारी (दि. 23) हुतात्मा राजगुरू यांची 94 वी पुण्यतिथी निमित्ताने पुन्हा एकदा प्रशासकीय यत्रंणेमार्फत जुजबी हालचाली दाखवण्यासाठी हा मालमत्ता धारकांच्या बैठकीचा केवळ फार्स ठरू नये; अर्थसंकल्पात हुतात्मा राजगुरू यांच्या विकास आरखड्यासाठी निधीची तरतुद केली नसल्याचे मालमत्ता धारकांचे म्हणणेअसून मालमत्ता धारकांचा बैठकांचा हा केवळ फार्स आहे अशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

# वाल्ह्यात जुलाब, उलट्यांची साथ, बंधाऱ्यातील पाणी दूषित : पाण्यावर शेवाळ, गवताचा थर

## बंधाऱ्यातील पाणी दूषित झाले असून पाण्याची दुर्गंधी परिसरात पससत असून डासांची उत्पत्ती वाढत असल्याने गावात साथीचे आजार पसरले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून वाल्हे (ता. पुरंदर) येथे जुलाब, उलट्याची साथ सुरू असल्याने अनेकजण प्राथमिक आरोग्य केंद्रात, तसेच खासगी दवाखान्यात उपचार घेत आहेत. वाल्हे येथील ग्रामपंचायत कार्यालया शेजारून वाहणाऱ्या ओढ्यावर सिद्धार्थनगर येथील तलाठी कार्यालया शेजारी बांधलेल्या बंधाऱ्यात सांडपाणी साठवून त्यावर शेवाळ, गवत वाढले आहे.त्यामुळे बंधाऱ्यातील पाणी दूषित झाले असून पाण्याची दुर्गंधी परिसरात पससत असून डासांची उत्पत्ती वाढत असल्याने गावात साथीचे आजार पसरले आहे.

गावाच्या प्रवेशद्वारावरच असलेल्या ओढ्यावर कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेला पूल चुकीच्या पद्धतीने बांधला गेल्याने गावातील दूषित पाणी पुलाजवळ असलेल्या सार्वजनिक पाणीपुरवठा विहिरीत मिसळले असल्याने नागरिकांना साथीच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे.

वाल्हे गावचे ड्रेनेज लाईनचे पाणी याचा ओढ्यामध्ये सोडले असल्यामुळे ते पाणी बंधऱ्यात जाते.त्यामूळे बंधारा परिसरात असलेल्या विहिरी व बोरवेलमधील जलस्त्रोत दूषित झाले आहेत. तसेच घाणीचे साम्राज्य वाढत असल्याने व ओढ्यात काहीजण कचरा टाकत असल्याने डासांचे प्रमाण ही वाढले असल्यामुळे परिसरात साथीचे आजाराचे प्रमाण जास्त पसरत आहेत.



> हा बंधारा हा छोटे लघु पाटबंधारे मालकीचे असून तो फोडून खराब पाणी काढून देणे ग्रामपंचायतीला शक्य नसल्याने,याबाबत जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाशी पत्रव्यवहार सुरू आहे. त्यांची संमती मिळाल्यानंतर या बंधाऱ्याला मध्यभागी तोडून त्याला ढापे बसवण्याचे नियोजन आहे. ढापे बसविल्याने दूषित पाणी झाल्यानंतर सोडता येईल. मात्र याबाबत लघू पाटबंधारे विभागाने लवकरात लवकर याकडे लक्ष देऊन मार्ग काढावा. तसेच ग्रामस्थांनी पाणी उकळून, गार करून प्यावे.
>
> **- अतुल गायकवाड, सरपंच**

> गावात तातडीने सर्व्हे सुरू करण्यात आला आहे. रुग्णांना जास्त बाधा होऊ म्हणून यासाठी गावांतर्गत सर्व्हे करून प्रतिबंधात्मक उपाय सुरू केले आहेत. साथ आटोक्यात असून वैद्यकीय अधिकाऱ्यांसह कर्मचारी रुग्णांवर लक्ष ठेवून आहेत. येथील पाणी नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले आहेत. लवकरच या पाण्याचा तपासणी अहवाल प्राप्त होईल.
>
> **- डॉ. प्रशांत आंधळे, वैद्यकीय अधिकारी, वाल्हे**